

रत्नागिरी : येथे मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे आयोजित महिला आरोग्य शिबिरात सहभागी वैद्यकीय अधिकारी.

# मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे महिलांसाठी आरोग्य शिबिर

रत्नागिरी : पुढारीवृत्तसेवा

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून फिनोलेक्स पाईप्स यांच्या सामाजिक बांधिलकीमध्ये सहभागी असणारी मुकुल माधव फाऊंडेशन आणि परकार हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, रत्नागिरी यांचे वतीने स्त्रीयांच्या स्तनाचे कर्करोग निदान शिबिर दिनांक ८ मार्च ते १५ मार्च या कालावधीमध्ये सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत परकार हॉस्पीटल रत्नागिरी येथे आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिराची सुरूवात परकार हॉस्पिटल रत्नागिरी येथे रविवारी सकाळी करण्यात आली. पहिल्याच दिवशी महिलांकडून चांगला प्रतिसाद मिळाला तसेच काही स्तनाच्या कर्करोगपिडीत महिला त्यांच्या मागील निदान अहवालासोबतही उपस्थित होत्या.

मागील वर्षी मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स पाईप्स यांचे श्रेयाने महिलांसाठी रत्नागिरी येथे कर्करोगाची चिकित्सा करणेकरीता सुविधा होण्याच्या दृष्टीने परकार हॉस्पीटल रत्नागिरी यांना मॅमोग्राफी आणि कोलोस्कॉपी यंत्र देणगी स्वरुपात उपलब्ध करून देण्यात आले आहे.

या शिबीराच्या कालावधीमध्ये ३५ वर्षावरील महिलांची चाचणी होणार आहे. सुरूवातीच्या काळात रत्नागिरीच्या महिलांना मुंबई किंवा कोल्हापूर येथे अशा चाचणीकरीता जावे लागत होते व ही सुविधा रत्नागिरी येथे उपलब्ध नसल्याने बऱ्याच महिला अशा चाचण्या करणेस अधिक आर्थिक व वेळेचा अपव्यय लक्षात घेता टाळाटाळ करीत होत्या साहजिकच त्याचा दुष्परिणाम नंतर त्यांचे प्रकृतीवर होत होता. प्रशांती कॅन्सर केअर मिशन, पुणे चे कॅन्सरतज्ञ डॉ. सी. बी. कोप्पीकर हे परकार हॉस्पीटल, रत्नागिरी येथे नियमित उपस्थित रहाणार आहेत. तसेच चिकित्सांचे अहवाल व मूल्यांकन हे प्रशांती कॅन्सर केअर टीम, पुणे यांचेमार्फत ऑनलाईन होणार आहे. फिनोलेक्स पाईप्सने प्रथम येणाऱ्या २०० गरीब व गरजू महिलांना या शिबीरामध्ये चिकित्सेकरीता सहभागी होणेकरीता स्वेच्छेने प्रायोजकत्व घेतले असून जास्तीत जास्त महिलांनी ह्या शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुकुल माधव फाऊंडेशनच्या वतीने करण्यात येत आहे.